दि.मु क्र. ३२/२०२३
सुशिला वि. सहदेव
निशाणी क्र.९४

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.1 सहदेव बाबुराव शेंडे –

**साक्षीदाराचा उलटतपास वादी तर्फे श्री. ए. व्हि. गजभिये यांद्वारे** –

हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं.१३४ च्या उत्तर बाजुकडे 1 हेक्टर जागा, शासनाने ग्रामपंचायतीच्या नविन आबादीसाठी संपादित केलेली आहे. सर्वे नं.१३४ च्या उत्तर बाजुल कोराड हे गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की मिराबाईचे शेत संपल्यानंतर, ग्रामपंचायतीने दोन पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत. हे म्हणणे खर आहे की पाण्याच्या टाकीला लागुन, आगोदरचे झोपडे पाडुन, पक्के घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की झोपडे असतांना, वादी हे माझ्याविरुद्ध, झोपडे अतिक्रमण मधले आहे म्हणुण माझ्याविरुद्ध, महसुली खात्याकडे तक्रारी करत होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानुषंगाने ग्रामपंचायत आणि मला नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की जिल्हा परिषद यांच्याकडुन वादग्रस्त जागा कोणाची आहे याबाबत चौकशी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या नावाची नोंद, जमिन विकत घेतल्याबाबतची सातबारा उता–यामध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्याजवळ नोंदणीकृत खरेदी पत्र नाही. १९७३ सालापासुन ३३७५ फुट जागा माझ्या कब्ज्यात आहे हे दाखविण्याकरिता माझ्याजवळ कोणताही शासकिय कागद नाही. हे म्हणणे खरे होते की पाण्याच्या टाक्याजवळ मोकळी जागा होती. हे म्हणणे खरे आहे की सन २०१२ मध्ये पक्के झोपडे बांधले. हे म्हणणे खरे आहे की झोपडे बांधत असतांना गावचे सरपंच माझ्या ओळखीचे होते. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायतीमध्ये नविन पदाधिकारी आल्यानंतर माझा झोपडयाचा फेरफार रदद झाला होता. हे म्हणणे खरे आहे की मिराबाईची शेती आणि जुनी आबादी यामध्ये कोणत्याही दुस–या व्यक्तीची शेती नाही.

प्रश्न– मोजणी नकाशामध्ये तुमच्या झोपडयाचा उल्लेख केलेला नाही ?

उत्तर माझ्या झोपडीचा उल्लेख नकाशामध्ये, मोजणी नकाशा १९९५ मध्ये नाही हे बरोबर आहे.

सन २०१९ मध्ये ग्रामपंचायतीने वादग्रास्त मिळकतीची पुन्हा मोजणी केली होती. मोजणीच्यावेळेस मी हजर होता. हे म्हणणे खरे आहे की या मोजणीमध्ये माझे बांधकाम हे नविन आबादीच्या क्षेत्रामध्ये, सर्वे नं. १३४ मध्ये दाखविण्यात आले. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की नकाशा हा पुर्वी त्रीकोणी होता व नंतर तो सरळ करण्यात आला. मिराबाईची जमिन पुणःसर्वे मध्ये वाढली किंवा नाही हे मला माहित नाही. त्रीकोणी भाग हा उत्तर बाजुचा होता. हे म्हणणे खरे आहे की १९९५

च्या मोजणी नकाशामध्ये त्रीकोणी भाग हा मिराबाईच्या कब्ज्यामध्ये दाखविण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की तो भाग उत्तर बाजुचा होता. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. १३४ चा जुणा सर्वे नं. ८६ होता. साक्षीदाराला तलाठी जवळील सर्वे नं. ८६ चा मॅप दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की मी ज्या जागेवर झोपडे बांधले ती ग्रामपंचायतीची जागा होती.

हे म्हणण खरे आहे की झोपडे बांधण्यापुर्वी मी गावातील घरामध्ये राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की वादमिळकतीवर माझा कोणताही मालकी हक्क नाही आणि मी अतिक्रमण करुन झोपडे बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या झोपडयापासुन जुण्या आबादीतील लोक, नविन आबादीत येण्यासाठी रस्त्याचा वापर करत आहेत. हे म्हणणे खरे आहे की अजुन पक्का रस्ता बनने बाकी आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की मी १००० चौ.फुट जागेमध्ये बांधकाम केले असुन, २००० स्के.फुट मोकळी जागा माझ्या ताब्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त मिळकत ही ग्रामपंचायतीच्या मालकीची असुन, सार्वजनिक वापराकरिता राखुन ठेवण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की सन २०१२ पुर्वी त्या ठिकाणी सांस्कृतीक कार्यक्रम होत होते. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्तीचा उपयोग वादी आणि गावातील इतर लोक सार्वजनिक कामासाठी करत होते. हे म्हणणे खरे नाही की २०१२ मध्ये अतिक्रमण केल्यामुळे गावातील लोकांच्या अधिकाराचे उल्लंघन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की ग्रामपंचायतीच्या पदाधिका–यांना हाताशी धरुन खोटे गावनमुने उतारे बनविले आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटया कागदपत्राच्या आधारे खोटा अधिकार सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.01.27 17:45:56 +0530

दिनांक २७/०१/२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Shri. R. J. Khobragade (Gr.–II) |